# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : ९९९/ मराठी भाषा समिती (ड-१७)**

**विधान भवन, मुंबई.**

**दिनांक : १६ जानेवारी, २०२५.**

**संदर्भ :** मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभापं-२०२४/प्र.क्र.११७/भाषा -२, दि. ३१ डिसेंबर, २०२४.

**:: प रि प त्र क ::**

राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये,मंडळे/महामंडळे,सार्वजनिक उपक्रम,सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे /महाविद्यालये इत्यादी संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दिनांक १४ ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो.त्यानुषंगाने या वर्षी देखील मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये आयोजित करण्यासाठी सर्व कार्यालयांना उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रक या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना कळविण्यात येते की, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या विद्यमाने "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" सोमवार, दिनांक २७ जानेवारी, २०२५ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे साजरा करण्याचे योजिले आहे. या कार्यक्रमाध्ये मराठी वाङ्मयीन साहित्याच्या अनुषंगाने कथाकथन,अभिवाचन,काव्यवाचन, मराठी साहित्यासंबंधी पुस्तकांचे रसग्रहण व स्वरचित मराठी कविता तसेच उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शनपर भाषण याचे आयोजन करण्यात येणार आहे.

उक्त सादरीकरणामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:चे नाव, पदनाम व ते ज्या साहित्याबद्दलची माहिती सादर करु इच्छितात त्याची संक्षिप्त माहिती मराठी भाषा समिती कक्षास बुधवार, दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.

२/-

सदर कार्यक्रमातील सादरीकरणामध्ये उत्कृष्ट व वाचनीय अशा साहित्याचा समावेश होणे आणि सादरीकरणाच्या विषयामध्ये वैविध्य राखण्यासाठी इच्छुकांकडून प्राप्त झालेल्या साहित्याबद्दलच्या माहितीची छाननी करण्यात येईल. कार्यक्रमांतर्गत सादरीकरणासाठी उचित साहित्य निश्चित झाल्यानंतर सादरकर्त्यास त्याचे सादरीकरण उपस्थितांसमोर करता येईल.

उक्त नमूद "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असल्याने या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी आपला सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा.

प्रकाशचंद्र खोंदले

**( प्रकाशचंद्र खोंदले )**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रति :**

सर्व अधिकारी/कर्मचारी.

**याची प्रत :**

१ मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद/मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४. महाराष्ट्र विधानसभेचे/विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
५. मा.सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६. मा.सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७. कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
९. विधिमंडळाची सर्व पक्ष कार्यालये.
१०. संगणक कक्ष (Website)
११. सुरक्षा विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
१२. अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
१३. निवड नस्ती.